**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 03.08.2025** **वार- रविवार**

---

## रेल्वे

पुण्याहून मध्य प्रदेशातल्या रेवा इथं जाणाऱ्या पहिल्या रेल्वे गाडीला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवला. गुजरातमधील भावनगर रेल्वेस्थानकावर उपस्थित राहून, भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीला तसंच अन्य काही रेल्वेगाड्यांना त्यांनी दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवला. गेल्या अकरा वर्षात ३४ हजार किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार झाले असून भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, रेल्वेमार्गाचं जाळं विकसित करण्यासाठी आणि रेल्वेची सुरक्षितता आणि स्वच्छता राखण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

## पीकविमा

पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधील १९ हजार ५२७ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी नोंदणी केली आहे. योजनेला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने नोंदणीसाठीची मुदत १४ ऑगस्टपर्यंत वाढवली

आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

## बनावट डॉक्टर

राज्यातील बनावट डॉक्टरांच्या वाढत्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी आता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने सर्व नोंदणीकृत डॉक्टरांसाठी ‘क्यूआर कोड’ प्रणाली अनिवार्य केली आहे. ‘नो युअर डॉक्टर’ या उपक्रमांतर्गत ही प्रणाली लागू केली जाणार आहे; यामुळे नागरिकांना डॉक्टरांची नोंदणी, पात्रता आणि परवाना याची सविस्तर माहिती थेट मोबाईलवर उपलब्ध होईल. इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणेचे अध्यक्ष डॉ. सुनील इंगळे यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून पुणे विभागातील महामार्गांवरील अपघातप्रवण क्षेत्रांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या महामार्गांवरील २२ पैकी १६ अपघातप्रवण ठिकाणे वाहतूक कोंडीमुक्त झाली असल्याचा दावा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं केला आहे.

## PCMC

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील प्रमुख रस्त्यांच्या दुतर्फा दर दहा मीटर अंतरावर देशी वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. निगडी प्राधिकरणाप्रमाणेच शहरातील इतर भागातील बीआरटी तसंच अन्य विकसित रस्त्यावर हिरवेगार वृक्ष असावेत, यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महापालिकेच्या हद्दीतील ज्या रस्त्यांवर हरित आच्छादनाचं प्रमाण कमी आहे, अशा रस्त्यांना वृक्षारोपण करताना प्राधान्य देण्यात येत आहे.

## क्रांतीसिंह जयंती

महाराष्ट्रामध्ये प्रतिसरकारच्या माध्यमातून इंग्रजांच्या विरोधात स्वातंत्र्यलढ्यासाठी सशस्त्र क्रांती करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती आज पुण्यात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि प्र - कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

## पाणीमीटर

धरणातून उचललं जाणारं पाणी आणि प्रत्यक्षात नागरिकांना मिळणारं पाणी यामध्ये असलेल्या तफावतीचा अभ्यास करून पाणी गळती थांबवण्यासाठी पुणे महापालिकेने शहरात १०० टक्के पाण्याचे मीटर बसवण्याचा निर्णय घेतला आहे. जे नागरिक मीटर बसवण्यासाठी विरोध करतील, त्यांची

नळजोडणी बंद करून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचा इशारा पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप चंद्रन यांनी दिला आहे.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत सर्व फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत. आवक वाढली असली तरी मागणीही वाढल्याने कोथिंबिरीच्या भावात किंचित वाढ झाली तर मेथीच्या भावात घट झाली. श्रावण महिन्यामुळे फळ बाजारात आवक वाढली असून पपई, डाळिंब आणि पेरूच्या भावात घसरण झाली, उद्याच्या श्रावणी सोमवारच्या पार्श्वभूमीवर फुलांचे दर वाढले आहेत.

**पोलीस**

पुणे जिल्ह्यात यवत इथे झालेल्या हिंसाचाराप्रकरणी आतापर्यंत १५ जणांना अटक झाली असून ५००हून अधिक जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केलेल्या १५ आरोपींना ६ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात येणार आहे. हिंसाचाराला कारणीभूत ठरलेली वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या तरुणालाही अटक करण्यात आली आहे. यवतमध्ये सध्या शांतता असून समाज माध्यमांवर पोलीस लक्ष ठेवून आहेत. या प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीत कोणताही पूर्वनियोजित कट आढळला नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## बचतगट

बचत गटातील महिलांना हक्काचं व्यासपीठ देण्यासाठी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुण्यातील प्रियदर्शनी वुमन्स फोरम आणि पायल तिवारी फाउंडेशनच्या वतीने गौरी गणपती साहित्य जत्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. फोरमच्या अध्यक्ष संगीता तिवारी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. येत्या 23 ते 25 ऑगस्ट दरम्यान ही जत्रा बालगंधर्व रंगमंदिराच्या वाहनतळ परिसरात आयोजित करण्यात आली आहे.

## हवामान

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान होतं, उद्याही ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**